सातारा जिल्हा परिषद,सातारा,ग्रामपंचायत विभाग.
दूरध्वनी क्रमांक ०२१६२-२३३८४३ ईमेल vptzpsatara2@yahoo.in

६४८६
क्र.ग्रापं/५/कावि/ /२०१६, दिनांक १/७/२०१६

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,.....(सर्व) जि.सातारा

विषय :- **आमचं गाव आमचा विकास - ग्रामपंचायत विकास आराखडा मानव विकास निर्देशांक विकसित करणेसाठी कामांची निवड करणेबाबत...**

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीपीडीपी-२०१५/प्र.क्र.३८/पंरा.-६ दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५.
२) मा.राज्य प्रकल्प संचालक,राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र.जीपीडीपी२०१५/प्र.क्र.३८/पं.रा.६ दिनांक ८ जून, २०१६

उपरोक्त संदर्भांकित दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ चे शासन निर्णयान्वये, १४ व्या वित्त आयोगाच्या निर्देशानुसार **'आमचं गाव आमचा विकास'** या उपक्रमांतर्गत जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेची प्रक्रिया सुरु आहे. त्यानुसार ग्रामपंचायत विकास आराखडयामध्ये कामांची निवड करताना मानव विकास निर्देशांक विकसित करण्यास आवश्यक कामांना प्राधान्य देण्यात यावे. यामध्ये आरोग्य, शिक्षण, रोजगार निर्मिती, अनुसूचित जाती/जमातीचे कल्याण, महिला व बालकल्याण यांच्या संबंधातील कामे प्राधान्यक्रमानुसार निवड करण्याबाबत निर्देश आहेत.

मा.राज्य प्रकल्प संचालक,राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र.जीपीडीपी२०१५/प्र.क्र.३८/पं.रा.६ दिनांक ८ जून, २०१६ नुसार, वार्षिक आराखडा तयार करताना खालीलप्रमाणे नियोजन करणे आवश्यक असलेचे कळविले आहे.

a. महिला व बाल कल्याण : १० टक्के
b. अनुसूचित जाती/जमातीच्या कल्याणासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात.
c. आरोग्य, शिक्षण, उपजिविका (Livelihood) : २५ टक्के

ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी विभागनिहाय **वरीलप्रमाणे तरतुद फक्त १४ व्या वित्त आयोगाच्या निधीसाठी लागू आहे**. तसेच, ग्रामपंचायतींना उपलब्ध असलेल्या स्त्रोतातून प्राप्त होणाऱ्या निधीमध्ये वाढ (दुप्पट वा दिडपट) न करता मूळ तरतुदीनुसार आराखडा तयार करण्यात यावा. फक्त १४ व्या वित्त आयोगांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीच्या दुप्पट निधी पंचवार्षिक आराखडयासाठी व दिडपट निधी वार्षिक आराखडा तयार करताना विचारात घेण्यात यावा, असे स्पष्टीकरण कळविण्यात आले आहे. त्यानुसार सदर बदलाबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिनांक ८ व ९ जून, २०१६ रोजीचे गट विकास अधिकारी यांचे कार्यशाळेमध्ये आपणास देण्यात आल्या आहेत.

मानव विकास निर्देशांक विकसित करण्यासाठी साधारणपणे ग्रमपंचायतीमार्फत आराखडयामध्ये समाविष्ट करता येऊ शकतील अशा काही कामांची यादी पुढीलप्रमाणे सुलभ संदर्भासाठी देणेत येत आहे. मानव विकास निर्देशांक विकसित करण्यासाठी आणखी काही गुणवत्तेची कामे घेण्याची मुभा ग्रामसभेला आहे. त्यानुसार संदर्भांकित दिनांक ८ जून, २०१६ चे पत्रातील तरतुदी विचारात घेवून कामांची निवड करावी.

**मानव विकास निर्देशांक विकसित करण्यासाठी कामांची यादी :-**

**अ) उपजिविका** (Livelihood):-

१) सामुहिक शेती, करार शेती .
२) कृषि औजारे बँक स्थापन करणे, कृषी यांत्रिकीकरण करणे.
३) शेतकरी प्रशिक्षण – विपणन, उत्पादनवृध्दी.
४) शेतकऱ्यांना शेतीविषयक सल्ला केंद्राची स्थापना.
५) ठिबक सिंचन, सूक्ष्मसिंचनास प्रोत्साहन.
६) शेतीमाल ने-आण करण्यासाठी रस्ते सुविधा उपलब्ध करणे.
७) राष्ट्रीय फलोत्पादन मिशन, कोरडवाहू शेती अभियान, राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम यामध्ये सहभाग.
८) मृदा आरोग्य पत्रिका (Soil Health Card)
९) बाजारभावाबाबत शेतकऱ्यांना माहिती देणे – मेसेजिंग ॲप इ.
१०) शेतकरी अभ्यास सहलीचे आयोजन करणे.
११) कृषी संशोधन शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविणेसाठी उपाययोजना करणे
१२) पीक विमा योजना राबविणे
१३) शेतकरी गटाची स्थापना करुन त्यांना अर्थसहाय्य देणे.
१४) सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती अवलंबणेसाठी उपाययोजना करणे.
१५) शेती माल प्रक्रिया उद्योग सुरु करणे.
१६) माती परिक्षण करुन उपचारासाठी आवश्यक ती खते अनुदाने देणे.
१७) गावाची पीकपध्दती निश्चित करुन अनुदानित बीज बँक तयार करुन शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध करुन देणे.
१८) शेती मालासाठी गोदाम तयार करणे, कोल्ड स्टोअरेज इ.
१९) कृषि पर्यटनाला प्रोत्साहन देणे.
२०) दुग्ध उत्पादन विपणन.
२१) शेणखत, लेंडीखत विपणन.
२२) कुक्कुटपालन, शेळीपालन अर्थसहाय्य.
२३) शेतीमालाचे पॅकेजिंग करणे.
२४) कृषि विद्यापीठांनी केलेले संशोधन अवगत करणेसाठी विद्यापीठांना भेटी.
२५) मुक्त गोठा प्रकल्प उभारणे.
२६) कृषि प्रदर्शन भरविणे.
२७) कम्युनिटी बायोगॅस.
२८) सामुहिक शेततळे.
२९) अस्तित्वातील मृद व जलसंधारण उपचार कामांची दुरुस्तीची कामे
३०) उत्पादक वृक्ष् लागवड/फळ लागवड
३१) परसबाग/किचन गार्डन उपक्रम राबविणेसाठी उपाययोजना करणे.
३२) कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे. विविध घटकांसाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे.
३३) किशोरवयीन मुलींना व्यवसाय कौशल्य (उदा.फॅशन डिझायनिंग, ब्युटीपार्लर इ.) विकसित करण्यासाठी प्रशिक्षण आयोजित करणे.
३४) महिलांसाठी व्यवसाय कौशल्य विकास कार्यक्रम आयोजित करणे.

**ब) शिक्षण** :-

१) ज्ञानरचनावादी साहित्य तयार करणे व दरवर्षी अद्यावत करणे.
२) ई-लर्निंग उपक्रम (संगणक,प्रिंटर,एलसीडी प्रोजेक्टर,स्मार्टबोर्ड, डिजिटल क्लासरुम)राबविणे.
३) प्राथमिक शाळेमध्ये साऊंड सिस्टीम व्यवस्था उपलब्ध करणे.
४) पटनोंदणीसाठी प्रचार व प्रसिध्दी साहित्य (प्लेक्स,माहितीपत्रके,नवागतांचे स्वागत)

५) विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार खेळाचे साहित्य पुरविणे.
६) अभ्यासक्रमानुसार प्रयोगशाळा साहित्य पुरविणे उदा. सूक्ष्मदर्शक यंत्र, टेलिस्कोप इ.
७) वाचनालय – प्रत्येक शाळेला किमान २०० पुस्तके देणे
८) प्राथमिक शाळेत सोलर पॅनल/सोलर लाईट व्यवस्था पुरविणे.
९) शाळांना ग्रंथालयीन कपाटे (बुक केस) पुरविणे.
१०) प्रयोगशाळा मांडणीसाठी रॅक, कडाप्पा कट्टे, इ.पुरविणे.
११) घसरगुंडी, सी-सॉ इ.खेळाची साधने निर्माण करणे.
१२) शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षक , ग्रामपंचायत सदस्य यांच्यासाठी उत्कृष्ट शाळा भेटीसाठी अभ्यासदौरा आयोजन करणे.
१३) अंगणवाडीमध्ये परसबाग करणे.
१४) अंगणवाडयांना संरक्षण कुंपणाची व्यवस्था करणे.
१५) अंगणवाडी इमारत बांधकाम, दुरुस्ती, रंरंगोटी इ.
१६) अंगणवाडीतील बालकांच्या बौध्दीक विकासासाठी आवश्यक खेळणी पुरविणे.
१७) अंगणवाडयांमध्ये सोलर पॅनेल व्यवस्था पुरविणे.
१८) अंगणवाडयांना चार्ट पुरविणे.
१९) अंगणवाडीतील बालकांना गणवेश पुरविणे.
२०) अंगणवाडीमध्ये शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेसाठी उपाययोजना करणे.
२१) इयत्ता १० व १२ वी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरु करणे. कंत्राटी शिक्षक नेमणूक करणे.
२२) माध्यमिक शाळेत अभ्यासिका सुरु करण्यासाठी सोलर लाईट, पुस्तके उपलब्ध करणे.
२३) गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.
२४) प्राथमिक शाळेस बेंचेस पुरविणे.

**ब) आरोग्य :-**

१) अर्भक मृत्यूदर, बालमृत्यू दर, माता मृत्यूदर कमी करणेसाठी उपाययोजना करणे.
२) किशोरवयीन मुलींना पोषण आहार व आजार प्रतिबंधात्मक विषयी ज्ञान देणेसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करणे.
३) किशोरवयीन मुलींचे HB (हिमोग्लोबीन), BMI (Body Mass Index) इ. नोंदी ठेवणेसाठी हेल्थ कार्ड छपाई करुन पुरविणे.
४) गरोदर मातांसाठी ANC क्लिनिक साठी स्वतंत्र रुम तयार करणे.
५) गरोदर माता लसीकरण ANC Vaccination.
६) सुरक्षित मातृत्व अभियान कार्यक्रमाची जनजागृती करणेसाठी handbills, Posters, Hoardings, Health-Wall करिता तरतुद करणे.
७) संस्थात्मक प्रसुतीचे नियोजन करणे. माहिती व प्रसार.
८) ANC गरोदर माता सोनोग्राफी व्यवस्थेसाठी देणेसाठी तज्ञ डॉक्टरांच्या सेवा पुरविणे. (कायदेशीर तरतुदींचे पालन करुन)
९) संदर्भित सेवा वेळेत मिळणेसाठी वाहन व्यवस्था.
१०) बालकांचे लसीकरण.
११) बालकांची आरोग्य तपासणी साठी Specialist डॉक्टरांची सेवा उपलब्ध करणेची व्यवस्था.
१२) बालकांसाठी संदर्भ सेवा (वाहन व्यवस्था).
१३) पोषण आहार व स्तनपानाविषयी ज्ञान व कौशल्यात वाढ करणेसाठी प्रचार व प्रसिध्दीसाठी तरतुद करणे.
१४) मातामृत्यू व अर्भकमृत्यू ऑडीट करणे.
१५) SAM/MAM मुलांची तपासणी करुन अंगणवाडीद्वारे पोषण आहार देणे.VCDC सुरु करणे.
१६) मुलां-मुलींचे प्रमाण – जनजागृती करणे माहिती व प्रसार साहित्य उपलब्ध करणे.
१७) मुलां-मुलींचे प्रमाण Score Board लावणे
१८) मुलां-मुलींचे प्रमाण PCPNPT ACT राबविणेसाठी माहिती व प्रसार करणेसाठी तरतुद.

१९) ANC Tracking करणे.

२०) मुलींच्या जन्मांचे स्वागत करणेसाठी विविध उपक्रम हाती घेणे उदा.थर्मल किट देणे इ.

२१) Vector borne diseases – डासमुक्त गाव करण्यासाठी नांदेड पॅटर्न मॅजिक पिट शोषखड्डे.

२२) गप्पी मासे पैदास केंद्र सुरु करणे.

२३) मोठया गावांमध्ये /गावांचा क्लस्टर करुन Fogging Machine घेणे.

२४) अपंगांसाठी सहाय्यभूत उपकरणे पुरविणे.

२५) Cancer Cervix - Staining Material, training, प्रायव्हेट डॉक्टर मानधनासाठी तरतुद.

२६) वृध्द/ज्येष्ठ नागरीकासाठी आरोग्य तपासणी कॅम्पचे आयोजन करणे व सहाय्यभूत साधने पुरविणे उदा.चष्मा, काठी इ.

२७) ४० वर्षावरील व्यक्तींसाठी मधुमेह तपासणी शिबीर घेवून generic औषध पुरवठा करणे.

२८) Anti malaria Mosquito net पुरविणे. इत्यादि.

उपरोक्तप्रमाणे यादी उदाहरणादाखल देण्यात आली असून, या यादीतील तसेच मानव विकास निर्देशांक विकसित करणेसाठी अन्य अनुषंगिक कामे ग्रामपंचायतींनी त्यांना उपलब्ध असलेला निधी, स्थानिक परिस्थिती, कायदेशीर तरतुदी, ग्रामसभेचा निर्णय इत्यादि बाबी विचारात घेवून कामे समाविष्ट करणेस हरकत नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,सातारा

प्रत :- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,सातारा
प्रत :- कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद,सातारा
प्रत :- महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद सातारा.
प्रत :- शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद सातारा.